# गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे

**शासन निर्णय क्र.विघयो-१०९७/प्र.क्र.१७५/मावक-२, दि.३१**

**उद्दिष्ट :-**

**राज्यामध्ये चामडयाच्या वस्तु व पादत्राणे दुरुस्तीच्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर अनु.जातीच्या व्यक्ती असुन त्यांच्या उपजिविकेचा प्रश्न याच्याशी निगडीत आहे. हे व्यावसायिक रस्त्याच्याकडेला ऊन, पावसात बसुन आपली सेवा देत असतात. त्यांचे ऊन, वारा, पाऊस यापासुन संरक्षण व्हावे. तसेच त्यांची आर्थीक व सामाजिक उन्नती व्हावी, यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, छावणी क्षेत्र, ग्रामपंचायत क्षेत्रात १००% शासकीय अनुदानावर पत्र्याचे स्टॉल देण्याची योजना कार्यान्वीत आहे.**

**स्वरुप -** ४ फुट x ५ फुट x ६.५ फुट इतक्या आकारमानाचा लोखंडी पत्र्याचा स्टॉल, गटई सामान खरेदीसाठी रु.५००/- इतके अनुदान दिले जाते.

अटी व शर्ती :-

•अर्जदाराचे वर्य १८ वर्षापेक्षा कमी नसावे.

•अर्जदाराच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामीण भागात रु.४००००/- व शहरी भागात रु.५००००/- पेक्षा अधिक नसावे.

•अर्जदार ज्या भागात स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड किंवा महानगरपालिका यांनी त्यास भाडयाने, कराराने, खरेदीने अगर मोफत परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी किंवा ती त्याच्या स्व मालकीची असावी.